माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ५०२/२०२२**

**अपिलार्थी, श्री. लालेंद्र वामनजी कुंभलवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु उपविभाग, तुमसर, ता.तुमसर जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु विभाग, भंडारा, ता.जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०९.२०२१ | २८.१०.२०२१ | ०१.१२.२०२१ | ३०.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १३.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " शासनाकडून ग्राहकांना मीटर जोडणीसाठी कालावधीनुसार वेळोवेळी जे निर्णय घेण्यात आले ते व याबाबद प्रशासकीय विभाग प्रमुखाकडून आलेले प्रशासकीय आदेश ही संपुर्ण माहिती रेकॉर्डनुसार व आवक रजिस्टर नोंदीनुसार छायांकित करुन सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-क, मे २०, २०१४ चे परिपत्रक तसेच CE(Dist)/D-III/Circular/२२१९७ date :- २०.०५.२००८ चे परिपत्रक अपिलार्थीस दिलेले आहे. महावितरण मध्ये याच परीपत्रकांच्या नियमावलीनुसार नवीन जोडणी दिली जाते. तसेच या परिपत्रकाव्दारे इतर नवीन वीज जोडणी विषयक परिपत्रक अधिक्रमित केलेली आहेत. सदर माहिती व इतर माहिती महावितरणचे संकेतस्थळ mahadiscom.in-consumer portal-

download- circulars- distribution section circulars वर सुध्दा उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०१.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र-अ नुसार चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिल्याने " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग तुमसर यांनी उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्यास १० दिवसांच्या आत द्यावी, असे आदेश पारीत केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १८.०२.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा मागितलेली माहिती पुन्हा अपूर्णच दिली " असे कारण नमुद करून व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. लालेंद्र कुंभलवार यांनी दिनांक १३.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-क, मे २०, २०१४ चे परिपत्रक तसेच CE(Dist)/D-III/Circular/२२१९७ date :- २०.०५.२००८ चे परिपत्रक अपिलार्थीस दिलेले आहे. महावितरण मध्ये याच परीपत्रकांच्या नियमावलीनुसार नवीन जोडणी दिली जाते. तसेच या परिपत्रकाव्दारे इतर नवीन वीज जोडणी विषयक परिपत्रक अधिक्रमित केलेली आहेत. सदर माहिती व इतर माहिती महावितरणचे संकेतस्थळ mahadiscom.in-consumer portal- download- circulars- distribution section circulars वर सुध्दा उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, मागितलेली माहिती ही १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असून जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वी योग्य माहिती दिलेली असल्याचे नोंदविले. तरीही

उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्यास १० दिवसांच्या आत देण्याचे निर्देश दिलेले आढळून येते. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०२२ रोजी माहिती देण्यात आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच विनामुल्य प्रदान करण्यात आलेली असून तसेच वरील माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४(१) अन्वये अधिकृत संकेतस्थळावर सर्व नागरीकांसाठी विनामुल्य उपलब्ध असल्याची बाब लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०४.२०२४**

जावक क्रमांक ६४४२ दिनांक 29 AUG 2024